नि.दि.दा.क्र.२६/२०१९

## निशाणी ३१ खालील आदेश

**(श्री. नवनाथ बबन खोमणे वगैरे वि. श्री.बबन गजानन खोमणे )**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादी यांनी मौजे जेजूरी येथील शेतजमीन मिळकत गट नं. १५७ बाबत खरेदीखत रदद करुन मिळणेसाठी व निरंतरचे ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल केलेनंतर जेजुरी गावचे विभाजन झाल्यामुळे जेजुरी येथील मिळकतींना नवीन गट नंबर देण्यात आलेले आहेत. गट नंबर १५७ ही मिळकत जेजुरी गावामध्येच समाविष्ठ करण्यात आलेली असून त्यास नवीन गट नंबर ८४ असा देण्यात आलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे वर्णनामध्ये ओळ नं. ४ मध्ये गट नंबर १५७ नंतर नवीन गट नंबर ८४ अशी दुरुस्ती दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती औपचारिक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. त्यामुळे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. २ यांनी म्हणणे (नि. ३७) दिले. वादी यांनी दिलेला अर्ज खरा व कायदेशीर नाही त्यामुळे तो रदद होणेस पात्र आहे. वादी यांनी जेजूरी

गावचे विभाजन झाल्यामुळे दावा मिळकत गट नंबर १५७ यास नवीन गट नंबर ८४ देण्यात आल्याचे नमूद केले आहे. सदरची मागणी मोघम स्वरुपाची आहे कारण त्यासाठी आवश्यक ते कोणतेही कागदपत्र वादी यांनी अर्जासोबत दाखल केलेले नाही. अर्जामधील कथन चुकीची, खोटी व बनावट आहेत. त्यामुळे वादीची दुरुस्तीची मागणी नामंजूर करावी अशी विनंती केली.

४. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा खरेदीखत रदद करुन मिळणेसाठी व निरंतरचे ताकीदीचा आहे. वादीच्या कथनानुसार गट नंबर १५७ ही मिळकत वाडी विभाजनामुळे जेजूरी गावामध्ये समाविष्ठ करण्यात आलेली असून त्यास नवीन गट नंबर ८४ देण्यात आलेला आहे. सदरची परिस्थीती दावा प्रलंबित असताना निर्माण झालेली आहे त्यामुळे अर्ज देण्यास वादींनी कोणताही विलंब केलेला नाही हे स्पष्ट दिसून येत आहे. दाव्याच्या अंतिम निकालासाठी दावा मिळकत स्पष्ट असणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची आहे. सदरच्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ आशय व विषयात कसल्याही प्रकारचा बदल होणार नाही. त्यामुळे दावा गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होणार आहे, सदर मागणी मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.३१) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत दाखल करावी.

(**खुल्या न्यायालयात जाहिर** )

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2024.12.04 11:00:42 +0530

सासवड **( सौ. एस. के. देशमुख )**

दिनांक – २८/११/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Mr. P. V. Satpute |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br><br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Saswad |
| (c) | Date of Decision (Judgment/Order) | | 28/11/2024 |
| (d) | Judgement /Order signed by P.O. on | : | 03/12/2024 |
| (e) | Judgement /Order uploaded on | : | 04/12/2024 |